I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S. (पोलीस ठाणे):** अहेरी **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0034 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/02/2025 07:34 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 07/02/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 08/02/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 14:42 तास **Time To (वेळेपर्यंत):** 14:20 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 09/02/2025 **Time (वेळ):** 07:34 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 008 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 09/02/2025 07:34 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** तोंडी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पूर्व, 7 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** वनपरिक्षेत्र कार्यालय , आलापल्ली ,अहेरी

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री काशीनाथ रामा दब्बा

(b) **Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

(c) **Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 1978

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

(h) **Occupation (व्यवसाय):** शेतकरी

(i) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | किष्टापुर पो वेलगुर , अहेरी , अहेरी, गडचिरोली, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | किष्टापुर पो वेलगुर , अहेरी , अहेरी, गडचिरोली, महाराष्ट्र, भारत |

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-8767600286

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री मारोती संभाजी गायकवाड | | | 1. वनपरिक्षेत्र,Town/Village (शहर / गाव): कार्यालय आलापल्ली,Tehsil (तहसील): अहेरी,Police Station (पोलीस ठाणे): अहेरी,District (जिल्हा): गडचिरोली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | श्रीमती ममता नामदेव राठोड | | | 1. वनपरिक्षेत्र,Town/Village (शहर / गाव): कार्यालय आलापल्ली,Tehsil (तहसील): अहेरी,Police Station (पोलीस ठाणे): अहेरी,District (जिल्हा): गडचिरोली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 3 | श्री गणेश उत्तम राठोड | | | 1. वनपरिक्षेत्र,Town/Village (शहर / गाव): कार्यालय आलापल्ली,Tehsil (तहसील): अहेरी,Police Station (पोलीस ठाणे): अहेरी,District (जिल्हा): गडचिरोली,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

**I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मोबाईल फोन | Realmi 8i कंपनिचे मोबाईल 1 नग कि. अ. 10000 | 10,000.00 |
| 2 | कागदपत्रे आणि मुल् यवान रोखे | इतर कोणतीही कागदपत्रे | गुन्हयाचे संबधीत मुळ कागदपत्र 14 पाने कि. अं. 00 | .00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराच्या 34 नोटा एकुण 17000/ रू | 17,000.00 |
| 4 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू.दराच्या 166 नोटा एकुण 83,000/रू | 83,000.00 |
| 5 | इतर | संकीर्ण/विविध | सँन्डीक्स कंपनिचे 32 जीबी मेमोरी कार्ड 02 नग कि. अं. 00 | .00 |
| 6 | इतर | संकीर्ण/विविध | आरोपीचे अंगातील पांढरा रंगाचे फुलपँट कि. अं. 00 | .00 |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :** 1,10,000.00

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| **S. No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.)** |
|---|---|

**12.** **First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्याद पोलीस स्टेशन अहेरी दिनांक 08/02/2025 नांवः- श्री काशिनाथ रामा दब्बा, वय 47 वर्षे, धंदा-शेती, रा. किष्टापूर (वेलगूर) पो. वेलगूर ता. अहेरी जि. गडचिरोली मो.नं. 8767600286 मी दिनांक 07/02/2025 रोजी सकाळी 09.20 वा. दरम्यान माझा जावई रोहीत सडमेक यांचे मोबाईल वरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील श्री. चंद्रशेखर ढोले साहेब यांना फोन करून एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याबाबत माहिती दिली असता, श्री. चंद्रशेखर ढोले साहेबांनी मला 11.00 वा. मौजा किष्टापूर गावाजवळ हजर राहा आम्ही त्याठीकाणी येवुन तक्रारीबाबत विचारपुस करतो असे सांगीतले. म्हणुन मी दिनांक 07/02/2025 रोजी दुपारी 11.00 वाजता दरम्यान मौजा किष्टापूर गावाजवळ माझे दुचाकी वाहन क्र.एमएच 33 एबी 0211 ने हजर होतो. थोडयाच वेळात

लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील श्री चंद्रशेखर ढोले साहेब हे शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने मौजा किश्टापूर गावा जवळ मी थांबुन असलेल्या ठिकाणी पोहचले. त्यानंतर मला ढोले साहेबांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. व त्यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी असल्याची माझी तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे. मी समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कार्यालय गडचिरोली कॅम्प महसुल मंडळ आलापल्ली येथे आज दिनांक 07/02/2025 रोजी हजर येवुन तक्रार देतो की, मी वरील पत्यावर राहत असून वरील प्रमाणे काम करतो. मी मौजा किष्टापूर येथील रहीवासी असुन मला सन 2024 मध्ये माझ्या नावाने व माझ्या आईच्या नावाने असे दोन घरकुल शासनाकडून मंजूर झाले आहेत. मला घरकुलाच्या बांधकामाकरीता विटा बनविणे असल्याने, मी विटा बनविण्याकरीता नातेवाईकाच्या ट्रक्टरने गावाजवळील नाल्यातील माती आणून विटा बनविणार होतो. त्यानुसार मी दिनांक 06/02/2025 रोजी नाल्यातील माती मजुरासह ट्रॅक्टरमध्ये भरत असतांना आलापल्ली वन विभागाचे श्री गायकवाड वनपाल साहेब हे अंदाजे सायंकाळी 06.30 वा. ते 07.00 वा. चे दरम्यान ट्रक्टरमध्ये माती भरत असलेल्या नाल्यावर येवुन "तुम्ही माती कशाला नेता व कुणाच्या परवानगीने नेता, तुमच्यावर व तुमच्या ट्रक्टरवर फॉरेस्ट अॅक्टची कारवाई करतो, अगर तुम्हा लोकांवर व ट्रक्टरवर कारवाई होवु दयायचे नसेल तर 1,10,000/- रू. घेवुन उद्या दुपारपर्यंत रेंज ऑफीसला येवुन भेटा" असे बोलुन मला लाच रक्कमेची मागणी केली व ट्रक्टर पकडून सोबत घेवुन आलापल्ली येथे निघुन गेले. श्री. गायकवाड वनपाल साहेब यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक दुश्मनी नाही अथवा भांडण नाही तसेच कोणतीही आर्थीक देवाण घेवाणचे व्यवहार नाहीत. परंतु गायकवाड साहेब यांनी आम्हावर व ट्रक्टरवर कोणतीही कारवाई न करण्याच्या कामाकरीता 1,10,000/- रूपये लाच रक्कमेची मागणी केली असून त्यांना 1,10,000/- रूपये लाच देण्याची माझी मुळीच ईच्छा नसल्याने त्यांचे विरूध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले 1,10,000/- रूपये हे माझे वैयक्तिक बचतीतील आहे.

श्री. चंद्रशेखर ढोले साहेबांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली. तसेच मी देखील त्यांना दिलेली तक्रार कथन केल्यानंतर सदरच्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर श्री चंद्रशेखर ढोले साहेबानी सुद्धा स्वाक्षरी केली. मी श्री ढोले साहेब यांचेकडे सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी माझे वैयक्तीक बचतीमधिल आणलेली रक्कम रू. 1,10,000/- (रू. 500/- दराच्या 220 चलनी नोटा) हजर केले. त्यावेळी त्यांनी सदर नोटचे क्रमांक पंचांसमक्ष नोंदवुन घेतले. त्यानंतर सदर नोटावर अँथ्रॅसिन पावडर लावल्यानंतरचे गुणधर्म पोहवा डांगे यांनी पावडर कश्या प्रकारे प्रकाशात व अंधारात काम करते याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. तद्नंतर मी त्यांचेकडे कारवाई कामी हजर केलेल्या लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर पोहवा डांगे यांनी लावुन एका खाकी रंगाचे कागदी लिफाफयात सुरक्षित ठेवुन सदर लिपाफा श्री ढोले साहेबांनी स्वतःचे ताब्यात ठेवुन घेतले व पंचासमक्ष दिलेल्या सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी त्यांचे कडील सोनी कंपनीचे व्हॉईस रेकॉर्डर कशा प्रकारे काम करतो याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले. मला श्री. गायकवाड वनपाल यांनी दिनांक 07/02/2025 रोजी दुपार पर्यंत 1,10,000/- रुपये घेवुन रेंज आफीस आलापल्ली येथे बोलावले असल्याने पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे

लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत मला व दोन्ही पंचांना सविस्तर सुचना दिल्या. त्यांनतर व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन वेळ 14.42 वा. व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 श्री अनुप मंडल यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाईस रेकॉर्डर चालु स्थीतीत ठेवुन पडताळणीकरीता जाण्यासाठी मी गायकवाड वनपाल यांना स्पिकर ऑन करून फोन केलो असता, त्यांनी मी फोनवर सविस्तर बोलु शकत नाही तुम्ही ऑफीसला येवुन भेटा असे सांगीतल्याने पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 14.49 वाजता बंद करण्यात आला. त्यानंतर मी व सापळा कारवाईतील सर्व सदस्य महसुल मंडळ कार्यालय आलापल्ली येथे पोहचुन पुन्हा व्हॉईस रेकॉर्डरवर 15.26 वा. पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे शर्टाचे आतमधील बनियानला लटकवून ठेवल्यानंतर मी पंच क्र. 1 यांचेसह रेंज ऑफीस आलापल्ली येथे माझे दुचाकी वाहन क्र. एमएच 33 एबी 0211 ने प्रत्यक्ष लाच पडताळणीकरीता रवाना झालो. मी पंच क्र. 1 सह रेंज ऑफीस आलापल्ली येथे गेलो असता श्री. गायकवाड वनपाल हे त्या ठिकाणी हजर मिळुन न आल्याने परत मी त्यांना फोन केलो असता त्यांनी आलापल्ली येथील चौकात येवुन भेट असे सांगीतल्याने मी आलापल्ली येथील चौकात गेलो. परंतू चौकात गायकवाड वनपाल हे हजर नव्हते. तेव्हा मी पंचासह त्यांची वाट पाहत चौकातच थांबुन असतांना तेथे फिरते वनसंरक्षण पथक आलापल्ली येथील श्री गणेश राठोड वनरक्षक हे चौकात येवुन माझे जवळ थांबले व मला ''तु मॅडमजवळ जा सर्व परिस्थीती सांग, मी मॅडमला कसेही सांगुन पहीलीच चुकी झालेली आहे म्हणुन पन्नासच्या आत आणीन'' असे बोलून लाच रक्कम देणेबाबत प्रोत्साहन देवुन निघुन गेले. श्री गायकवाड वनपाल हे चौकात आले नसल्याने मी पुन्हा पंच क्र. 1 यांचेसह रेंज ऑफीस आलापल्ली येथे जावुन वनपरिक्षेत्र अधिकारी राठोड मॅडम यांना भेटुन गायकवाड वनपाल यांचेबाबत विचारणा केली. तेव्हा त्यांनी गायकवाड वनपाल यांना फोन करून तुमचे लोक आले आहेत तुम्ही ऑफीसला या असे सांगीतले व राठोड मॅडम यांनी मला ''कोर्टात जाल तर बाराच्या भावात जाल, आम्ही साहनुभुती दाखवून तुम्हाला रात्रो सोडलं, आज पर्यत कोणालाच सोडल नाही.'' असे बोलल्या. तेव्हा थोडयाच वेळात श्री. गायकवाड वनपाल रेंज ऑफीस आलापल्ली येथे आले व राठोड मॅडमसोबत चर्चा करून मला कार्यालया बाहेर नेवुन ''तुमच्यावर व तुमच्या ट्रक्टरवर फॉरेस्ट अँक्टची कारवाई करतो, अगर तुम्हा लोकांवर व ट्रक्टरवर कारवाई होवु दयायचे नसेल तर मला 1,00,000/- रू. दया व उद्या बयाण घेण्याकरीता ट्रक्टरवरचे ड्रायव्हर व मजूर यांना घेवून या'' असे बोलुन लाच रकमेची मागणी करून दि. 08/02/2025 रोजी 9.00 ते 9.30 वा. चे दरम्यान रेंज ऑफीस आलापल्ली येथे स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने घडलेली हकीकत सांगणेकरीता मी व पंच क्र.1 सह नियोजित ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 18.07 वाजता बंद करण्यात आला. नंतर माझी सविस्तर अंगझडती घेतली. श्री ढोले साहेबांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषण ऐकुन व पंच क्र. 1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री. गायकवाड, वनपाल यांनी मला घरकुल बांधकामाकरीता विटा बनविण्यासाठी नाल्यातुन माती मजुरासह ट्रॅक्टरमध्ये भरत असतांना ट्रक्टर पकडुन आम्हांवर व ट्रॅक्टरवर फॉरेस्ट अँक्टची कारवाई न करण्याकरीता 1,10,000/- रू लाच रक्कमेची मागणी करुन तडजोडीअंती 1,00,000/- रू लाच

रक्कम दि. 08/02/2025 रोजी स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याची खात्री केली. व श्री.गायकवाड, वनपाल यांचेविरूध्द दि. 08/02/2025 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरविले. व श्री. गायकवाड वनपाल यांनी लाच मागणी पडताळणी वेळी 1,10,000/-रू. ची मागणी करून 1,00,000/- रूपये स्विकारण्याची संमती दर्शविल्याने मला पंचासमक्ष अँथ्रॉसिन पावडर लावलेली बंद खाकी रंगाचे कागदी पाकीटात ठेवलेले 1,10,000/- रूपयाचे लिपाफा पोलीस हवालदार श्री. डांगे यांचेकरवी सदर पाकीटातुन 1,10,000 रुपये रकमेपैकी 10,000/- रू. लाचेची रक्कम काढुन त्यावरील अँन्थ्रासीन पावडर स्वच्छ पुसुन सदर नोटांवर पावडर नसल्याची खात्री करुन मला परत देवुन लेखी पावती दिली व मला दि. 08/02/2025 रोजी सकाळी 11.45 वा. दरम्यान महसुल मंडळ कार्यालय आलापल्ली येथे हजर राहण्याच्या सुचना दिल्या. याबाबत सविस्तर नोंदी प्रात्यक्षिक व पडताळणी पंचनामा क्र. 1 मध्ये नमुद आहे. मी आज दि. 08/02/2025 रोजी मी माझे दुचाकी वाहनासह त्या ठिकाणी हजर होतो. तेव्हा सापळा कारवाई करण्याकरीता श्री. ढोले साहेब, शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने महसुल मंडळ अधिकारी कार्यालय येथे आले. त्यानंतर माझी अंगझडती घेवुन अँथ्रॉसिन पावडर लावलेली बंद खाकी रंगाचे कागदी पाकीटात ठेवलेले 1,00,000/- रूपयाचे लिपाफा पोहवा श्री. डांगे यांचेकरवी सदर लिपाफयातून 1,00,000/-रू. (500 रुपयांच्या 200) नोटा काढून माझे फुलपॅन्टचे समोरील उजव्या बाजुचे खिश्यात घडी करुन अलगद ठेवली व मला श्री. ढोले साहेबांनी सदर रक्कम हि श्री. गायकवाड वनपाल यांनी मागणी केल्याशिवाय काढुन देवु नये अशी सुचना दिली. सदर वेळी सापळा पथकातील लाच रकमेस अँन्थ्रासीन पावडर लावलेले पोहवा डांगे यांना कारवाई पथकातुन वगळून शासकीय वाहनातच थांबण्याच्या सुचना दिल्या त्यानंतर सापळा पार्टीतील सर्व सदस्य, पंच, व आमचे हातास अँन्थ्रासीन पावडर लागले नसले बाबत खात्री करण्यात आली. त्यानंतर सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत स्पष्ट सुचना देवुन सापळा पथकातील सर्व सदस्यांना त्यांनी सापळा ठिकाणी थांबावयाच्या जागा निश्चीत करवुन देवुन श्री. गायकवाड, वनपाल यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर रेंज आँफीस आलापल्ली चे बाहेर दर्शनी भागी येवून मी माझे खांद्यावरील दुपट्टा डोक्यावर बांधून लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. श्री. ढोले साहेब यांचे सुचनेवरून पोशि संदिप घोरमोडे यांनी व्हाँईस रेकाँर्डर सुरू करून व्हाँईस रेकाँर्डरवर वेळ 12.28 वा. पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हाँईस रेकाँर्डर चालू स्थितीत ठेवल्यानंतर मी श्री. गायकवाड वनपाल यांना फोन केलो असता त्यांनी रेंज आँफीस आलापल्ली येथे येण्यास सांगितल्याने व्हाँईस रेकाँर्डर माझे शर्टाचे आतमधील बनियानला लटकवून ठेवून मला पंच क्रं. 1 यांचेसह माझे दुचाकी वाहनाने रेंज आँफीस आलापल्ली येथे श्री. गायकवाड, वनपाल यांना पैसे देण्याकरीता रवाना झालोत. त्याचवेळी सापळा पथकातील काही सदस्य माझे मागोमाग आले. मी रेंज आँफीस आलापल्ली येथे गेलो असता त्या ठिकाणी श्री. गायकवाड, वनपाल हे हजर मिळून आले. तेव्हाच ट्रक्टर ड्रायव्हर, मजूर व रूशी सडमेक हे रेंज आँफीसला आले आणि श्री. गायकवाड यांनी त्यांचे बयाण घेतले. त्यांनतर श्री. गायकवाड, वनपाल यांनी मला वनपरिक्षेत्र अधिकारी राठोड मॅडम यांच्या कक्षात घेवून गेले तेव्हा मी राठोड मॅडम यांना गायकवाड यांनी एक लाख रूपये म्हणतात काही तरी कमी करा असे बोललो असता राठोड मॅडम यांनी मला "त्या मातीची

आम्हाला रॉयल्टी देवुन त्याची “बाकायदा त्याची पावती फाडली जाते” असे बोलुन 17,000/-रू. दंडाची पावती फाडली. त्यानंतर श्री. गायकवाड यांना मी अँथ्रॅसिन पावडर लावलेले रू. 1,00,000/- लाचेची रक्कम माझे फुलपॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्यातुन उजव्या हाताने काढून श्री. गायकवाड, वनपाल यांना दिले असता, त्यांनी उजव्या हाताने स्विकारून त्यातील 17,000/-रू. दंडाची रक्कमेची पावती राठोड मॅडमने देवुन पावतीसह रक्कम बॅकेत भरण्याकरीता श्री गायकवाड यांचेकडे दिले असता त्यांनी दंडाच्या पावतीसह 17,000/- रूपये त्याच्या फुलपँटच्या डाव्या बाजुच्या समोरील खिशात व बाकीची 83,000/- रू. लाच रक्कम त्यांनी परीधान केलेल्या फुलपॅन्टच्या समोरील उजव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर मी रेंज ऑफीस आलापल्लीच्या बाहेर निघून दर्शनी भागी येऊन सापळा पथकास दिसेल अश्या रितीने खांद्यावरील दुपट्टा डोक्यावर बांधून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकातील स्टाफने श्री. गायकवाड, वनपाल यांना रेंज ऑफीस आलापल्ली कार्यालयाच्या बाहेर पकडून पुढील कारवाई केली. त्यानंतर पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर 14.20 वाजता बंद केले व नंतर माझी अंगझडती घेण्यात आली. लाच रक्कम 83,000/- रू., व दंडाच्या पावतीसह 17,000/- रू, रिअलमी कंपनीचा 8 आय मॉडेलचा 01 नग मोबाईल व एक जुना वापरता पांढ-या रंगाचा फुलपॅन्ट हे श्री. गायकवाड, वनपाल यांचेकडुन तसेच नमुद कारवाईतील दोन मेमोरी कार्ड पंचासमक्ष जप्तीपत्रका प्रमाणे पुराव्याकामी जप्त केले. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी श्री. ढोले साहेब यांनी सापळा पंचनामा क्र. 2 मध्ये घेतले आहेत. तरी 1) श्री. मारोती संभाजी गायकवाड, वय 35 वर्षे, पद- वनपाल, उपवनक्षेत्र तानबोडी, वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय आलापल्ली यांनी मला घरकुल बांधकामाकरीता विटा बनविण्यासाठी नाल्यातुन माती मजुरासह ट्रॅक्टरमध्ये भरत असतांना ट्रक्टर पकडुन आम्हांवर व ट्रॅक्टरवर फॉरेस्ट अँक्टची कारवाई न करण्याकरीता पंचासमक्ष 1,10,000/- रू लाच रक्कमेची मागणी करुन 83,000/- रू लाच रक्कम व दंडाच्या पावतीसह 17,000/- रू. असे एकुण 1,00,000/- रू. स्विकारतांना मिळून आल्याने तसेच 2) श्रीमती ममता राठोड, वनपरिक्षेत्र अधिकारी, कार्यालय वनपरिक्षेत्राधिकारी आलापल्ली यांनी मला लाच मागणी पडताळणी व सापळा कार्यवाही दरम्यान प्रत्यक्ष हजर राहून गायकवाड, वनपाल यांना लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन दिल्याने तसेच 3) श्री. गणेश राठोड, वनरक्षक, कार्यालय वनपरिक्षेत्राधिकारी, फिरते वन संरक्षण पथक, आलापल्ली यांनी मला हे लाच मागणी पडताळणी दरम्यान लाच रक्कम देण्यास प्रोत्साहन दिल्याने त्यांच्याविरूध्द माझी कायदेशीर फिर्याद आहे. माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)**

I.I.F.-I (एकीकृत अन् वेषणफॉर्म - १)

**Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** SWAPNIL TEJERAO IJJPAWAR (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** SWAPNIL TEJERAO EJJATPAWAR

**Rank (हुद्दा):** SI (Sub-Inspector)

**No. (क्र.):** 15101000402STIM8501C

14. **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

15. **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen ) (संशयीत/आरोपीचे (माहित असलेल या/पाहिलेल या) शारीरिक वैशिष टये, व यंग आणि इतर तपशील)**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | 1990 | | - | | चेचक: क्र. |
| 2 | महिला | 1980 | | - | | चेचक: क्र. |
| 3 | पुरुष | 1987 | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**

**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**